जगभर

# जॉर्ज फ्लॉइडची पोलिसी हत्या

## चन्द्रशेखर पुरन्दरे

**काय घडले ?**

घटना अमेरिकेतील मिनियापोलीस नावाच्या शहरात घडली. २५ मे रोजी संध्याकाळी ८ वाजता जॉर्ज फ्लॉइड नावाचा ४६ वर्षांचा कृष्णवर्णीय इसम एका दुकानातून सिगरेटी खरेदी करून बाहेर पडला. त्याने खरेदीसाठी बनावट नोट वापरली होती. दुकानदाराने पोलिसांना बोलावले. प्रथम दोन, नंतर दोन असे चार पोलीस लगेच आले. तोपर्यंत जॉर्ज त्याच्या गाडीत बसला होता. पोलिसांनी त्याला बाहेर हुसकावून हात मागे घेऊन बेड्या घातल्या. तो पोलिसांना सहकार्य करायला तयार होता, त्यामुळे या बळजुबरीची जरूर नव्हती. त्यात तोल जाऊन तो रस्त्यावर पडला. एका गोऱ्या पोलिसाने त्याला पालथा पाडला आणि त्याच्या मानेवर गुडघा दाबून धरला. 'मला श्वास घेता येत नाही' असे जॉर्ज सोळा वेळा म्हणाला. त्याकडे पोलिसांनी दुर्लक्ष केले. इतर तिघांपैकी दोघांनी त्याला दाबून धरला, बघ्यांनी ढवळाढवळ करू नये याकडे चौथा पोलीस लक्ष ठेवून होता. त्यातील एकाने जॉर्जला वळवावे म्हणजे त्याला श्वास घेता येईल असे म्हणण्याचा निष्फळ प्रयत्न केला. बघ्यांपैकी एक-दोघांनीही तसे सुचवले. पण मानेवर जवळजवळ नऊ मिनिटे गुडघा रोवल्यामुळे जॉर्जचा गुदमरून मृत्यू झाला. मृत्यू झाल्यावरही पोलिसाने गुडघा बाजूला केला नाही. या प्रकाराचे रेकॉर्डिंग बऱ्याच कॅमेऱ्यांवर झाले. काही प्रत्यक्षदर्शी, काही त्या दुकानाचे वगैरे. ते सोशल मीडियावर प्रसृत होताच सार्वजनिक संताप उसळला व देशभर निषेध मोर्चे निघू लागले. [नंतर घटनेत असणाऱ्या चार पोलिसांना बडतर्फ करण्यात आले व खून, खुनाला प्रतिबंध न करणे इत्यादी आरोपांवरून खटले भरण्यात आले.]

**निषेधाची पार्श्वभूमी**

ही सुटी, एकल घटना नाही. कृष्णवर्णीयांना दिल्या जाणाऱ्या व्यवस्थात्मक हीन वागणुकीचे हे एक ताजे उदाहरण मात्र आहे. गोरे श्रेष्ठ, इतर-वर्णीय कनिष्ठ या दृढ पूर्वग्रहावर आधारित ही व्यवस्था आहे. ती व्यवस्था बदलणे आवश्यक ही कृष्णवर्णीयांची काही पिढ्या मागणी आहे. ऐतिहासिक दृष्ट्या कृष्णवर्णीय काही अमेरिकेत प्रवेश द्या म्हणून आले नाहीत. त्यांना हिंसेने, सक्तीने गुलाम म्हणून आफ्रिकेतून आणण्यात आले. त्या पापाबद्दल बोच किंवा त्यांच्याकडे माफी दूरच, पण त्यांना वाळीत टाकण्याचे प्रयत्न मात्र सर्व क्षेत्रात चालू राहिले. त्यांच्या राहण्याच्या जागा बकाल, त्यांच्या मुलांना नीट शिक्षणाच्या संधी नाहीत, आरोग्याची आबाळ, नोकऱ्या नाहीत, वगैरे. कृष्णवर्णीयांचे सरासरी उत्पन्न गोऱ्या अमेरिकनांच्या सरासरी उत्पन्नाच्या एक-दशांश असते. अमेरिकेत कृष्णवर्णीय १२ टक्के आहेत पण उद्योग-व्यवसायात उच्चपदी फक्त तीन टक्के. ही विषमता आजवर पोसण्यात आली आहे. निषेध या एकूण अन्यायाविरुद्ध आहे.

**निषेध**

निषेधाचे प्रमुख दोन प्रकार - एक - व्यवस्थेच्या वंशद्वेषाविरुद्ध निषेध; दोन - पोलिसांच्या अत्याचाराविरुद्ध निषेध. जॉर्ज फ्लॉईडच्या हत्येत दोन्ही एकत्र आले. फ्लॉईडचा खून हे निमित्त. पण वाईटातून चांगले म्हणावे असे काही परिणाम निषेधातून झाले आहेत. हे परिणाम निरनिराळ्या स्तरांवर, निरनिराळ्या देशांमध्ये दिसून येत आहेत.

व्यवस्थेविरुद्ध अमेरिकाभर सुमारे २००० शहरात उत्स्फूर्त निदर्शने झाली, मोर्चे निघाले. वॉशिंग्टन या राजधानीतही. त्यात तरुण गोरे लक्षणीय प्रमाणावर होते. म्हणजे हा प्रश्न फक्त कृष्णवर्णीयांचा नाही तर संपूर्ण समाजाचा आहे याची सार्वजनिक जाणीव दिसून आली. Black Lives Matter या नावाची चळवळ आधीपासून अस्तित्वात होतीच ती एकदम जोमात आली. ब्रिटन, फ्रांस, जर्मनीतील अनेक शहरांत लोक रस्त्यावर आले. उर्वरित युरोपमध्ये स्वित्झर्लंड, इटली, स्पेन, पोर्तुगाल, हॉलंड, बेल्जीयम, अगदी

बल्गेरियासारखा मागासलेला देश, ट्युनिशिया या आफ्रिकेतील देशातही सार्वजनिक निषेध झाले. टोकियो, सेऊल या आशियातील शहरात मोठ्या प्रमाणावर निषेध झाले. प्रत्येक ठिकाणी Black Lives Matter, George Floyd आणि त्याचे अखेरचे शब्द - I can't breathe याचे फलक होते. जॉर्जला निश्चेष्ट व्हायला ८ मिनिटे ४६ सेकंद लागले होते. काही ठिकाणी लोकांनी निदर्शनात तितका वेळ शांतता पाळली व त्याला श्रद्धांजली वाहिली.

ऑस्ट्रेलियात तेथील आदिम लोकांचा जमीनजुमला व हक्क गोऱ्या लोकांनी सत्ता हातात घेतल्यापासून म्हणजे गेली दोन शतके नाकारले गेले आहेत. हे लोक ऑस्ट्रेलियाचे खरे भूमिपुत्र. ते ऑस्ट्रेलियाचे अनेक हजार वर्षे रहिवासी. युरोपिअन अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आले. त्यांनी ऑस्ट्रेलिया वसाहत केली. भूमिपुत्रांच्या हक्कांचा प्रश्न वंशद्वेषाचा. फ्लॉईड प्रकरणानंतर तो पुन्हा पुढे आला आहे. सिडनी, मेलबर्नमध्ये याबाबत निदर्शने झाली.

मेक्सिको, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका देशांत लोकांनी पोलिसी दहशतवादाविरुद्ध निदर्शने केली. ब्राझीलमध्ये २०१८ मध्ये सहा हजाराहून जास्त लोक पोलीस कस्टडीत मृत्यू पावले होते. त्यातील ७५ टक्के कृष्णवर्णीय. म्हणजे जॉर्ज फ्लॉईड-सारखाच प्रश्न.

**पोलिस खात्याची अप्रस्तुती**

पोलीस हवेतच कशाला हा प्रश्न आता विचारला जात आहे. हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे. जेथे ही घटना झाली, त्या मिनियापोलीस शहराच्या नगरपालिकेने संपूर्ण पोलीस खाते बरखास्त करण्याचा निर्णय घेतला. त्या नगरसेवकांच्या मते आहे ती पोलीस यंत्रणा आतून सुधारणे अशक्य आहे. त्यापेक्षा ते खाते रद्दच करावे. पर्यायी संस्था कशा निर्माण करायच्या ते नागरिकांना विश्वासात घेऊन ठरवले जाईल. या टोकापर्यंत ते शहर जाईल किंवा न जाईल पण घटनेचे दूरगामी परिणाम आणि एकूण सामाजिक विचारांची नवी दिशा यावरून लक्षात यावेत. पोलीस खात्याचे बजेट शून्य नाही तरी बरेच कमी करावे असा विचारही काही शहरात चालू झाला आहे. न्यू यॉर्क शहराने पोलिसांचे बजेट कमी करून तो पैसा समाजसेवी संस्थांना देण्याचे योजले आहे.

दरम्यान , म्हणजे निषेध मोर्चे चालू असतानाच, आणखी एका कृष्णवर्णीयाचा अटलांटा शहरात १२ जूनला संध्याकाळी एका पोलिसाने पाठीत गोळ्या झाडून खून केला. कृष्णवर्णीयाचा गुन्हा एवढाच की तो एका खाण्याच्या दुकानाबाहेर गाडीत झोपला व मागच्या गाड्या अडकल्या. म्हणजे पोलीस संरक्षक आहेत का संहारक असा प्रश्न कृष्णवर्णीयांना पडणे समजण्या-सारखे आहे.

हा मुद्दा आपल्याकडेही लागू आहे. विशेषत: तथाकथित 'आतंकवाद्यां'च्या encounter मधील पोलिसी हत्यांच्या संदर्भात.

**राजकारण्यांची अप्रस्तुती**

आणखी एक गोष्ट या निषेध मोर्चांमुळे पुढ्यात आली. ती म्हणजे हा लोकांचा उत्स्फूर्त आविष्कार आहे. कृष्णवर्णीय निर्वाचित खासदार, आमदारांना बाजूला ठेवून लोक सरळ आमनेसामने सरकारच्या विरोधात उतरले. ते त्यांच्या निर्वाचित प्रतिनिधींकडे जात बसले नाहीत. लोकशाहीच्या निर्वाचन पद्धतीवरचा लोकांचा विश्वास किती प्रमाणात उडालेला आहे, हे कळून येते. आपल्याकडे दलित व मुस्लिम समाजाच्या राजकीय नेतृत्वाच्या संदर्भात अशा प्रक्रियांची कल्पना [किंवा आशा] करावी.

**इतिहासाचे पुनरावलोकन**

या वातावरणाचा आणखी एक निश्चितच स्वागतार्ह परिणाम झाला आहे. पाश्चात्य देशातील १७ व्या शतकापासूनच्या 'थोर' व्यक्तींचे शहरातील, उद्यानातील, शैक्षणिक संस्थातील पुतळे सामाजिक असंतोषाला कारणीभूत झालेले आहेत. एकविसाव्या शतकातील मानवी स्वातंत्र्याच्या व हक्कांच्या नव्या जाणीवांमुळे हे शक्य झाले आहे. त्या कसोटीवर या 'थोर' लोकांपैकी बरीचशी मंडळी युद्धपिपासू, वसाहतवादी ठरतात. त्यांच्या स्मारकांची, पुतळ्यांची या निषेधांदरम्यान विटंबना सुरू झाली. उदा. ब्रिस्टॉल या ब्रिटनमधील शहरात एडवर्ड कॉल्सटन नावाच्या माणसाचा पुतळा होता. हा गुलामांचा व्यापारी. तेव्हाच्या रॉयल आफ्रिकन कंपनीतर्फे त्याने किमान ८०,००० आफ्रिकन्स गुलाम म्हणून अमेरिकेला नेले. त्यात स्त्रिया, पुरुष व लहान

मुलेही होती. त्या नफ्यातला बराच पैसा त्याने शहराला दिला. त्यामुळे तो स्थानिक हिरो होता. फ्लॉईडच्या हत्येनंतर निषेधकांनी त्याच्या पुतळ्याचे उच्चाटन केले. पुतळा रस्त्यावर आडवा पाडला, गोलगोल ढकलत ब्रिस्टॉल बंदराकडे नेला. या प्रवासात एक निषेधक पुतळ्याच्या मानेवर गुडघा टेकून बसला. जसा पोलीस जॉर्ज फ्लॉईडच्या मानेवर बसला होता. अखेर पुतळा ब्रिस्टॉल बंदरात पाण्यात फेकण्यात आला.

१९व्या शतकाच्या शेवटी दक्षिण आफ्रिकेत हिरे आणि सोन्यांच्या खाणींचा मालक सेसिल रोड्स होता. खाणीत स्थानिक मजुरांचे अतोनात शोषण होत असे. हा ब्रिटिश साम्राज्यवादी. तो काही काळ त्यावेळच्या केप कॉलनीचा पंतप्रधानही होता. त्याचा पुतळा ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीत आहे. तो हलवण्याचा निर्णय आता ऑक्सफर्ड कॉलेजने घेतला आहे.

लंडनमधील चर्चिल पुतळ्यावर 'हा माणूस वर्णद्वेष्टा होता', असे सत्य लिहिण्यात आले. अमेरिकेच्या गुलामगिरीच्या काळातील तेथील तेव्हाच्या हिरोंचे पुतळे त्या त्या नगरपालिकांनी तरी हलवले किंवा निषेधकांनी विद्रुप केले. फ्रान्समध्येही असे काही पुतळे व स्मारके आज वादग्रस्त झाली आहेत. बेल्जीयममध्ये, मेक्सिकोमध्ये अशाच वसाहतवादी, गुलामगिरीतून सत्ता व पैसा मिळवणाऱ्यांचे पुतळे विद्रुप करण्यात आले.

अशा घटनांवरची ब्रिटनच्या पंतप्रधानांची प्रतिक्रिया व्यवस्थेची प्रातिनिधिक प्रतिक्रिया आहे. 'तुम्ही इतिहास संपादित करू शकत नाही'. कारण तसे करणे व्यवस्थेला सोयीचे नाही, किंबहुना तो व्यवस्थेला धोकाच आहे.

**निरीक्षण**

जॉर्ज फ्लॉईडच्या हत्येचे जगभर प्रतिसाद उठावेत ही मोठी दिलासा देणारी घटना आहे. वसाहतवादावर चर्चा तर सुरू झाली आहे. या घटनेची दीर्घजीवी प्रक्रिया होते का नाही हे आज सांगता येत नाही. पण निदान सद्यस्थितीचे आणि इतिहासाचे पुनर्मूल्यन होत आहे ही आशेची बाब आहे.

www.purandarearts.com
www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk